सेवाग्राम, जिल्हा वर्धा परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सेवाग्राम विकास आराखड्यांतर्गत राष्ट्रीयकृत बँकेत, "चालू खाते" (Current Account) उघडण्यास मंजुरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक- सेविआ २०१७/प्र.क्र.४३ /का.१४४४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ फेब्रुवारी, २०१८.

वाचा : १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. सेविआ २०१३/प्र.क्र.१७/का.१४४३, दिनांक १ ऑक्टोबर, २०१६.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. सेविआ २०१७/प्र.क्र.६/का.१४४३, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७.

प्रस्तावना :

सेवाग्राम, जिल्हा वर्धा परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सेवाग्राम विकास आराखड्यातील रु.१४४९९.७५ लाख (रु. एकशे चव्वेचाळीस कोटी, नव्यान्न लाख, पंच्याहत्तर हजार फक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावित कामांना संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे व संदर्भाधिन शासन निर्णय क्र. २ अन्वये, सन २०१७-१८ मध्ये सेवाग्राम विकास आराखड्यासाठी अर्थसंकल्पित तरतूद रु. ९३.८० कोटी (रु. त्र्याण्णव कोटी, ऐंशी लाख फक्त) पैकी, रु. १०.०० कोटी (रु. दहा कोटी फक्त) निधी जिल्हाधिकारी, वर्धा यांना वितरित करण्यात आला आहे.

सेवाग्राम विकास आराखड्यातील सर्व कामे विहीत कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. या करिता निधी अभावी मर्यादा येऊ नयेत, तसेच कामाच्या प्रगतीनुसार निधी वेळेत उपलब्ध होण्याकरिता राष्ट्रीयकृत बँकेत "चालू खाते" (Current Account) उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सेवाग्राम, जिल्हा वर्धा परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी, सेवाग्राम विकास आराखड्यातील सर्व कामे विहीत कालावधीत करताना निधी अभावी मर्यादा येऊ नयेत, तसेच कामाच्या प्रगतीनुसार निधी वेळेत उपलब्ध होण्याकरिता, आराखड्यांतर्गत वितरित केलेला निधी कोषागारातून आहरित करून खर्च करण्यासाठी, जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत "चालू खाते" (Current Account) उघडण्यास पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ) "चालू खाते" (Current Account) मध्ये केवळ सेवाग्राम विकास आराखड्याकरिताच शासनाकडून प्राप्त होणारा निधी जमा करण्यात येईल. सेवाग्राम विकास आराखड्यातील मंजूर कामावर होणा-या

खर्चासाठी उपलब्ध निधी वापरण्यात येईल. त्याचा हिशेब स्वतंत्रपणे जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे ठेवण्यात येईल.

ब) "चालू खाते" (Current Account) मध्ये सेवाग्राम विकास आराखड्यातील मंजूर कामांकरिता शासनाकडून वेळोवेळी वितरित करण्यात आलेला निधी व त्यावर मिळणारे व्याज याकरिता जिल्हाधिकारी, वर्धा हे प्रचलनास जबाबदार असतील.

क) "चालू खाते" (Current Account) मध्ये सेवाग्राम विकास आराखड्यातील मंजूर कामे पूर्ण होईपर्यंत चालू राहील. सर्व मंजूर काम पूर्ण झाल्यावर "चालू खाते" (Current Account) शासनाच्या पूर्व मान्यतेने बंद करण्यात येईल व शिल्लक असलेल्या रकमेचा ताळमेळ घालून, जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडून संपूर्ण रक्कम शासकीय लेख्यामध्ये जमा करण्यात येईल.

२. सेवाग्राम विकास आराखड्यातील मंजूर कामाच्या प्रगतीबाबत विभागीय आयुक्त, नागपूर व जिल्हाधिकारी, वर्धा यांनी प्रत्येक महिन्यात आढावा घ्यावा. तसेच "चालू खाते" (Current Account) च्या पासबूकाच्या प्रती जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दर तीन महिन्यांनी शासनास सादर सादर कराव्यात.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७/१८/कोप्र-५, दिनांक २३.१.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०११२१३३६९०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vidya Hampayya
Date: 2018.02.01 12:18:13 +05'30'

(विद्या हम्पय्या)
शासनाचे उप सचिव

प्रत: तातडीने कार्यवाहीकरिता,

१) जिल्हाधिकारी, वर्धा,
२) विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर

प्रत: माहितीसाठी,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.मंत्री वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा.राज्यमंत्री वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

५) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६) सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१,मुंबई
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेख परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर
९) वित्त विभाग (व्यय-८), /(अर्थ-१६),/कोषा. प्र.-५) मंत्रालय, मुंबई
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा
११) जिल्हा नियोजन अधिकारी, वर्धा
१२) नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई
१३) निवड नस्ती, नियोजन विभाग, का.१४४४, मंत्रालय, मुंबई.